## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1984.

## THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) (AMENDMENT) ACT, 1984.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २० सप्टेंबर १९८४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डी. एल. चौधरी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1984.

## AN ACT FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VACANT LANDS (FURTHER INTERIM PROTECTION TO OCCUPIERS FROM EVICTION AND RECOVERY OF ARREARS OF RENT) ACT, 1980.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २४ सप्टेंबर १९८४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

### सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

**महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

८० चा ाराष्ट्र १६.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० या अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित **संक्षिप्त नाव.** करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, १९८४ असे म्हणता येईल.

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम १६ यात कलम ४-अ समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) अधिनियम, १९८० याच्या कलम ४ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९८० चा महाराष्ट्र १६.

कलमे २, ३ व ४ यांतील उपबंध शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांना लागू न होणे.

"४-अ. (१) कलमे २, ३ व ४ यांत काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु पोट-कलम (२) च्या उपबंधांस अधीन राहून,—

(अ) कलम २ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या आणि उक्त प्राधिकरणांपैकी कोणत्याही प्राधिकरणाच्या मालकीच्या असलेल्या व अशा कोणत्याही जमिनीच्या किंवा तीवरील बांधकामाच्या संबंधात, केंद्र सरकार, राज्य शासन, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना करण्यात आलेली कोणतीही महानगरपालिका किंवा नगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ अन्वये रचना करण्यात आलेले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ अन्वये रचना करण्यात आलेले प्राधिकरण किंवा मंडळ, कोणतेही इतर विधिसंस्थापित महामंडळ, शासकीय कंपनी किंवा स्थानिक प्राधिकरण (यात यापुढे ज्यांचा सामूहिकरीत्या "उक्त स्थानिक प्राधिकरणे" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्याकडून किंवा त्याच्या वतीने अशा कोणत्याही भोगवटादाराकडून यथास्थिती, कोणतेही भाडे, भरपाई, फी, कोणत्याही सुविधा पुरविण्याचा सेवा खर्च वसुलीसाठी किंवा गोळा करण्यासाठी कोणताही हुकूमनामा किंवा आदेश मिळविण्याकरिता किंवा अशा वसुलीसाठी कोणताही हुकूमनामा किंवा आदेश अंमलात आणण्याकरिता केलेला कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही, याबाबत कलम ३ अन्वये कोणत्याही न्यायालयाने स्थगिती दिलेली असेल आणि अनिर्णीत ठेवली असेल तर ती त्यासंबंधात ज्या टप्प्यावर स्थगिती दिलेली असेल त्या टप्प्यापासून तीबाबतचे कामकाज पुढे चालू करण्यात येईल ; आणि

१९७४ चा महाराष्ट्र ४.

१९७७ चा महाराष्ट्र २८.

(ब) अशी रिकामी जमीन किंवा बांधकाम यासंबंधात, यथास्थिती भाडे, भरपाई, फी, कोणत्याही सुविधा पुरवण्याचा सेवाखर्च म्हणून भोगवटादाराकडून येणे व वसुलीयोग्य असलेली कोणतीही रक्कम उपरोक्त प्राधिकरणांपैकी कोणत्याही प्राधिकरणाने गोळा करणे किंवा ती वसूल करणे किंवा ती गोळा करण्यासाठी किंवा वसूल करण्यासाठी आवश्यक असेल अशी कृती किंवा उचित कार्यवाही करणे हे कायदेशीर असेल व ती तशी कायदेशीर असल्याचे नेहमीच समजण्यात येईल ; आणि

(क) महाराष्ट्र रिकाम्या जमिनी (भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना निष्कासित करण्यापासून व भाड्याची थकबाकी वसूल करण्यापासून आणखी अंतरिम संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, १९८४ याच्या प्रारंभानंतर, त्यासंबंधात दाखल करण्यात आलेला, कोणताही असल्यास, कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही ही, सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयास दाखल करून घेता येईल : १९८४ चा महाराष्ट्र २६.

परंतु, आवश्यक असेल त्यावेळी, कलम ५ चे उपबंध कोणत्याही अशा कार्यवाहीस लागू होतील.

(२) सन १९८० चे दिवाणी अपील क्रमांक ३८६ (एनसीएम) बाबत सर्वोच्च न्यायालयाकडून दिलेली स्थगिती विचारात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून किंवा राज्य शासनाकडून पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती ही, उक्त स्थगनादेशात अंतर्भूत असलेल्या निदेशांना बाध न आणता, करण्यात आलेली असेल.".

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.